# मेट्रो कामाची गाडी पावसातही धावणार



दत्ता खेडेकर

१ कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ ही संपूर्ण भुयारी मार्गिका होणार असून आझाद मैदान येथेही भुयारीकरणासाठी शाफ्टमध्ये टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) उतरविण्यात आल्या आहेत. मेट्रोचे काम पावसातही सुरु राहणार आहे. पावसाळ्यात काम करताना कर्मचाऱ्यांचा पाय घसरु नये म्हणून बाजूला कापड लावून विशेष खबरदारी घेतली आहे.

२ मेट्रो-३ मार्गिकेचे आझाद मैदान येथे मेट्रो स्थानक बनणार आहे. यासाठी येथे मोठ्या प्रमाणावर खोदकामासाठी साहित्य आणण्यात आले आहे. नुकत्याच सुरु झालेल्या पावसापासून बचाव व्हावा यासाठी एमएमआरसीतर्फे येथे प्लास्टिकसह अन्य सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.





३ कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गाचे काम वेळेत पूर्ण करण्याचे आव्हान एमएमआरसीपुढे आहे. पावसात येथील कामासाठीचे लोखंडी साहित्य गंजू नये म्हणून त्या सामग्रीवर प्लास्टिक आच्छादून खबरदारी घेण्यात येत आहे.